CMYK

... तर मास्क लावाच! डॉक्टरांचा मुंबईकरांना सल्ला; देशातील सक्रिय रुग्णसंख्येत झपाट्यानं वाढ >> पान 2

जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमांतर्गत आमदार संजय केळकर यांनी नागरिकांशी साधला संवाद >> पान 3

वार्षिक सर्वसाधारण सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले मार्गदर्शन; नाविण्यपूर्ण उपक्रमास प्रोत्साहन द्या- गुलाब खरात >> पान 4

**सुविचार**

सकारात्मक विचारांमध्ये शक्ती आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 266 ■ शनिवार, दि. 07 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





शिक्षण आणि समाज व्यवस्थेतील मुद्द्यांवर भाष्य करणारा चित्रपट, 'निबार'मधील नवीन पोस्टर प्रदर्शित! आतील पान

# जगातील सगळ्यात उंच रेल्वे पुलाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

श्रीनगर : चिनाब नदीवर बांधलेल्या जगातील सगळ्यात उंच रेल्वे पुलाचं आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खास बनवलेल्या वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. जगातील सगळ्यात उंच पूल चिनाब नदीवर बांधण्यात आला असून हा पूल जम्मू काश्मीरमधील बक्कल आणि कौरी या गावांना जोडतो. विशेष म्हणजे या पुलाचं लोकार्पण १९ एप्रिलला करण्यात येणार होतं. मात्र हा कार्यक्रम पुढं ढकलण्यात आला. रेल्वे पुलाच्या उद्घाटनाला रेल्वे मंत्री अश्वनी वैष्णव, जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांची उपस्थिती होती.

चिनाब नदीवर जगातील सगळ्यात उंच पूल : काश्मीर खोऱ्यात रेल्वे सेवा पुरवण्यासाठी चिनाब नदीवर अत्याधुनिक रेल्वे पूल बांधण्यात आला. हा पूल जगातील सगळ्यात उंच असल्याचा दावा करण्यात येत आहे. या पुलाचं लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं आहे. या पुलामुळे काश्मीर खोरे देशाच्या इतर भागाशी जोडलं जाणार आहे. काश्मीर आणि जम्मूसारख्या भूभागात आव्हानात्मक अभियांत्रिकी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भारताच्या पायाभूत सुविधांच्या कौशल्याचा हा नमुना आहे. पंतप्रधान आज वंदे भारत रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. यावर्षी १९ एप्रिल रोजी ही ट्रेन सुरू होणार होती, परंतु 'खराब हवामानामुळे' ती पुढं ढकलण्यात आली.

ईद उल अधाच्या अगोदर पुलाचं उद्घाटन : पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील संबंध खराब झाले. पहलगाम हल्ल्याला भारतानं चोख प्रत्युत्तर दिल्यानं पाकिस्तानचे धाबे दाणाणले. त्यामुळे काश्मीर खोऱ्यात अशांतता पसरली. मात्र आता काश्मीर खोऱ्यात शांतता असून ईद उल अधा २०२५ च्या अगोदर वंदे भारत ट्रेन आणि चिनाब नदीवरील जगातील सगळ्यात उंच पुलाचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं आहे.



## मिठी नदीतून भ्रष्टाचाराचा गाळ! अभिनेता दिनो मारियाच्या घरी ईडीचा छापा

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील बहुचर्चित मिठी नदी घोटाळ्याप्रकरणी आता चौकशीचा फास आणखी घट्ट झाला आहे. आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लाँड्रिंग प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणा सक्तवसुली संचालनालयने मुंबईतील सुमारे १५ ठिकाणी एकाचवेळी छापेमारीची कारवाई केली आहे. या प्रकरणात चौकशीच्या फेऱ्यात अडकलेला अभिनेता दिनो मारियाच्या घरी ईडी दाखल झाली.मुंबईतील मिठी नदी गाळ हटवण्याच्या कंत्राटात झालेल्या कोट्यवधींच्या गैरव्यवहार प्रकरणात आता बॉलीवूड अभिनेता दिनो मोरिया आणि त्याचा भाऊ सँटिनो मोरिया हे ईडीच्या रडारवर आले आहेत.

## सातारा एलसीबीची मोठी कारवाई, मोक्कातून जामीनावर सुटलेल्या दोन गुंडांकडून ६ पिस्तुलांसह ३0 काडतुसे जप्त

**सातारा/प्रतिनिधी :** मोक्का गुन्ह्यातून जामीनावर सुटलेल्या आणि सातारा जिल्ह्यातून तडीपार केलेल्या दोन गुंडांना पिस्तुले विक्रीसाठी आल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेनं जेरबंद केलं. त्यांच्याकडून ६ पिस्तुले, ६ मॅगझिन, ३० काडतुसे, मोबाईल आणि कारसह १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अमीत ऊर्फ बिऱ्या कदम (रा.लोणी) आणि विशाल महादेव चव्हाण (रा. भोळी, ता. खंडाळा, जि. सातारा), अशी संशयितांची नावे आहेत.

बकरी ईद आणि संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांची झाडाझडती घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी दिले होते. तसेच तडीपार गुंडांची माहिती काढुन कारवाई करण्याची सुचनाही केली होती. खबऱ्याकडून एलसीबीचे पोलीस निरीक्षक अरूण देवकर यांना माहिती मिळाली की, मोक्कातून जामीनावर सुटलेले आणि सातारा जिल्ह्यातून तडीपार असलेले दोघेजण मारुती कारमधून (एम. एच. १२ टी. एस. १८८९) नीरा–लोणंद मार्गावर देशी बनावटीची पिस्टल आणि काडतुसे विक्रीसाठी येणार आहेत.

## पुण्यात पुन्हा मुळशी पॅटर्न; जमिनीच्या वादातून वकिलाने बंदूक दाखवली; व्हिडीओ व्हायरल

**पुणे/प्रतिनिधी :** शिक्षणाची पंढरी म्हणून नावलौकिक असलेल्या पुणे (इल्हा) शहराची औद्योगिक नगरी अशीही ओळख बनली असून येथील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे, बिल्डर लॉबी, गुंठा मंत्री आणि रिअल इस्टेटमुळे पुणे जिल्ह्यात गुंडगिरी व गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. येथील या व्यवसायामुळे आर्थिक व्यवहारातून टोळ्या निर्माण होतानाचे चित्र देखील यापूर्वी दिसून आले आहे. मुळशी पॅटर्न हा चित्रपट देखील पुणे जिल्ह्यातील वाढते औद्योगिकरण आणि जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारातून वाढलेल्या गुंडगिरीवरच आधारित आहे. आता, पुन्हा एकदा जमिनीच्या वादातून एका वकिलाने बंदूक बाहेर काढल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. वादातील जमिन पाहण्यासाठी आलेल्या वकिलाची जमिन मालकाने अडवणूक केल्यानंतर संबंधित वकिलाने चक्क बंदुकीचा धाक दाखवल्याचं पाहायला मिळत आहे.

# विकासाच्या अजेंड्यात गडचिरोली अग्रक्रमावर- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## जिल्ह्यातील मान्सूनपूर्व तयारीचा घेतला आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**गडचिरोली/प्रतिनिधी : ''माझ्या विकासाच्या अजेंड्यावर गडचिरोली जिल्हा अग्रक्रमांकावर असल्याने शासनाच्या सर्व विभागांनी याची जाणीव ठेवावी आणि त्यांच्या अजेंड्यावर देखील हा जिल्हा अग्रक्रमावर ठेवून त्या पद्धतीने गडचिरोलीत विकासकामे करावी,'' असे आवाहन मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्हा नियोजन भवन येथे घेतलेल्या मान्सूनपूर्व तयारीच्या आढावा बैठकीत केले.**

बैठकीस सहपालकमंत्री तथा वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नरेश झुरमुरे, सीसीएफ जितेंद्र रामगावकर, खासदार नामदेव किरसान, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आमदार रामदास मसराम तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यात पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी जिल्हा आणि राज्य पातळीवर



समन्वय यंत्रणा कार्यरत आहे. ती सुरळीतपणे कार्यरत राहील याकडे लक्ष द्यावे. विशेषतः मध्यप्रदेशातून येणाऱ्या पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांकडे दक्षतेने लक्ष देण्याचे निर्देश दिले.

पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये पुरेसे अन्नधान्य, औषधांचा साठा आणि गर्भवती महिलांसाठी सुरक्षित ठिकाणी स्थलांतराच्या उपाययोजनांची तपासणी करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. संपर्क तुटणाऱ्या गावांसाठी करावयाच्या कायमस्वरूपी उपयोजनाअंतर्गत मंजूर पाच टप्प्यांपैकी किमान दोन टप्पे यंदा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वनक्षेत्रातील रस्त्यांच्या बांधकामांबाबत वनविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग आणि संबंधित इतर विभागांनी समन्वय ठेवून काम करावे. टायगर कॉरिडॉर व्यतिरिक्त इतर मार्गांवर >> पान २

## धर्मांतर म्हणजे एका प्रकारे हिंसाचं, घर वापसीचा स्वीकार करा; सरसंघचालक मोहन भागवतांचं आवाहन

**नागपूर/प्रतिनिधी :** आदिवासी समाजात धर्मांतराचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढत आहे. खरं तर धर्मांतराकडे लक्ष देण्याची गरज असल्याचं आवाहन काँग्रेसचे माजी केंद्रीय राज्यमंत्री अरविंद नेताम यांनी केलंय. ते काल नागपूरात आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्ता विकास– वर्गाच्या समारोपीय कार्यक्रमात बोलत होते. अरविंद नेताम संघाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. छत्तीसगड राज्यात आताची सर्वात मोठी समस्या धर्मांतराची आहे. कोणत्याही सरकारने याकडे कधीही गांभीर्याने लक्ष दिलं नाही. एकमेकांवर दोषारोप करण्यापलीकडे राजकीय नेते, पक्ष काहीच करीत नसल्याचा आरोप अरविंद नेताम यांनी केलाय.



मात्र, ही समस्या समूळ नष्ट करण्याची क्षमता ही केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघात आहे. संघाला आपली गती वाढवण्याची गरज असल्याचे ते म्हणालेत. छत्तीसगडच्या बस्तरमध्ये नक्षलवादासोबतचं धर्मांतर मोठी समस्या आहे. दोन समस्या आहेत, त्यामुळे संघ आणि आदिवासी समाजाने या समस्येवर उपाय शोधला पाहिजे, असंही त्यांनी अधोरेखित केले. >> पान २

## निवडणुकीच्या तोंडावर कोल्हापूर महापालिकेत सतेज पाटलांना धक्का

## काँग्रेसचा गटनेता शिंदे सेनेच्या गळाला

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीकडून महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना घेण्याचा कार्यक्रम सुरुच आहे. कोणत्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत जिल्हा परिषद, महानगरपालिकांवर महायुतीचा झेंडा फडकण्यासाठी तिन्ही पक्ष कामाला लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसमध्ये झालेल्या घोळानंतर तसेच उमेदवारी डावलल्यानंतर काँग्रेसमध्ये अस्वस्थता समोर आली होती.

माजी स्थायी समिती सभापती शारंगधर देशमुख शिंदेंच्या शिवसेनेत



काँग्रेस आमदार तथा कोल्हापूर काँग्रेस जिल्हाध्यक्ष सतेज पाटील यांचे प्रमुख शिलेदार माजी स्थायी समिती सभापती शारंगधर देशमुख शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. आज (६ जून) ठाण्यात त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार राजेश क्षीरसागर उपस्थित होते. पुढील काही दिवसात शारंगधर देशमुख आणि त्यांच्या सोबतचे काँग्रेसचे काही नगरसेवक शिंदे सेनेत प्रवेश करणार आहेत. त्यामुळे आगामी मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस गटनेता गळाला लागल्याने शिंदे गटाला फायदा होणार आहे.

३५ नगरसेवक शिंदेसेनेत येणार, राजेश क्षीरसागरांचा दावा

दरम्यान, काही दिवसांपूर्वी बोलताना काँग्रेसचे दहा नव्हे, तर ३५ नगरसेवक शिंदेसेनेत येणार असल्याचा दावा आमदार राजेश क्षीरसागर यांनी केला होता. टप्प्याटप्प्याने क्षेपणास्त्रे डागून विरोधकांचे तळ उद्ध्वस्त केले जातील, असेही क्षीरसागर यांनी म्हटले होते.

# विशाळगडावर बकरी ईद साजरी होणारच, उच्च न्यायालयाच्या आदेशात तातडीने हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** संरक्षित धार्मिक स्थळांवर अनेक धार्मिक विधी होत असतात, मग त्या कोणत्याही धर्माच्या का असेनात. विशाळगडावर बकरी ईद साजरी करण्यापासून रोखण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार देत कोल्हापूर जिल्हा प्रशासनासला दणका दिला आहे. दरम्यान, बकरी ईदनिमित्त ७ जून आणि त्यानंतर ८ ते १२ जून दरम्यान विशाळगडावर कुर्बानीकरता मुंबई उच्च न्यायालयानं सशर्त परवानगी दिली आहे. मात्र त्यामुळं इथं कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, या कारणाखाली कोल्हापूरच्या पोलीस अधीक्षकांनी कुर्बानीची परवानगी नाकारल्याचे आदेश जारी केले होते. तसंच जिल्हा प्रशासनाने उच्च न्यायालयाच्या परवानगीला तातडीनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

कोल्हापूर जिल्हा प्रशासनाला दिलासा देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार : जिल्हा प्रशासनाची याचिका शुक्रवारी न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठापुढं सुनावणीसाठी आली होती. संरक्षित ऐतिहासिक स्थळांवर अनेक धार्मिक विधी या होतच असतात. गेल्यावर्षीही इथं ही विधी पार पडली होती आणि उच्च न्यायालयानं परवानगी दिलीय तर ती गेल्यावर्षीच्या आधारावरच दिली असणार. त्यामुळं या प्रकरणावर तातडीनं सुनावणीची आवश्यकता नसल्याचं स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयानं जिल्हा प्रशासनाला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. त्यामुळं इथल्या दर्ग्यात चार



दिवस चालणाऱ्या उरूसमध्ये सहभागी होण्याकरता येणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

काय आहे याचिका? : हजरत पीर मलिक रेहान दर्गा ट्रस्टनं यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेद्वारे बकरी ईद निमित्त विशाळगडावर प्राण्यांची कुर्बानी देण्याची परवानगी मागण्यात आली होती. शाहूवाडी तालुक्यातील विशाळगडावर जनावरांच्या कुर्बानीवर बंदी घालण्यासाठी पुरातत्व आणि संग्रहालय संचालक, कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जारी केलेल्या विविध पत्रांना ट्रस्टनं आव्हान देत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

ट्रस्टकडून शेकडो वर्षांच्या परंपरेचा दाखला : राज्य सरकारच्यावतीनं न्यायालयात दावा करण्यात आला की, इथल्या संरक्षित स्मारकात प्राण्यांची कत्तल होते. कायद्यानुसार पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या किल्ल्याच्या परिसरात अन्न शिजवण्यास आणि सेवन करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळं इथं कुर्बानीची परवानगी नाकारण्यात आली आहे.

मात्र, याला विरोध करत याचिकाकर्त्यांच्यावतीनं वकिल सतीश तळेकर यांनी युक्तिवाद केला की, किल्ल्याच्या परिसरात असलेला दर्गा हा ११ व्या शतकापासून अस्तित्त्वात आहे. हे एक ऐतिहासिक स्मारक असून या दर्ग्यात हिंदू आणि मुस्लीम दोन्ही धर्मांचे भाविक गेली अनेक वर्ष एकत्र येत आहेत. बकरी ईदनिमित्त कुर्बानी देणं ही इथली शेकडो वर्षांपासूनची एक प्रथा आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, दर्गा परिसरात किंवा स्मारकाच्या ठिकाणी कुठेही प्राण्यांचा कत्तल केली जात नाही. ती मुख्य ठिकाणापासून १.४ किमी दूर एका बंद खोलीत केली जाते. कुर्बानीनंतरचे मांस हे प्रसाद म्हणून येणाऱ्या सर्व भाविकांना प्रसाद म्हणून वाटले जाते.

CMYK

## जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात!

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का ? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का ? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का ? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# ... तर मास्क लावाच! डॉक्टरांचा मुंबईकरांना सल्ला देशातील सक्रिय रुग्णसंख्येत झपाट्यानं वाढ

नवी दिल्ली : पाच वर्षापूर्वी आरोग्य यंत्रणांना हादरवणाऱ्या कोरोना संसर्गानं पुन्हा डोकं वर काढलं असून हा संसर्ग सध्या भारतभर पसरल्याचं पाहायला मिळत आहे. केंद्राकडून जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार सध्याच्या घडीला देशात कोरोनाच्या सक्रिय रुग्णांची संख्या ५३६४ वर पोहोचली आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं जारी केलेल्या माहितीनुसार आतापर्यंत ४७२४ रुग्णांना कोविडवरील उपचारांनंतर रुग्णालयातून डिस्चार्जही देण्यात आला. अतिशय झपाट्यानं वाढलेल्या या रुग्णसंख्येमुळं आता देशाच्या विविध राज्यातील आरोग्य विभागही सतर्क झाल्याचं पाहायला मिळत आहे.

आतापर्यंत कोणत्या राज्यात किती रुग्ण?

दिल्ली ५६२
गुजरात ६१५
कर्नाटक ४१५
केरळ १६७९
महाराष्ट्र ५४८
राजस्थान १०७
तामिळनाडू २२१
उत्तर प्रदेश २०५
पश्चिम बंगाल ५९६

कर्नाटक (१ मृत्यू) ६५ वर्षीय पुरूष उच्च रक्तदाब, अनियंत्रित मधुमेह मेलीटस (अपघाती कोविड-१९ पॉझिटिव्ह स्थिती)

केरळ (२ मृत्यू) यामध्ये दोन्ही रुग्ण सहव्याधी असल्याचं लक्षात आलं.

पंजाब (१ मृत्यू) ६९ वर्षीय महिलेला फुफ्फुसांचा थ्रोम्बोइम्बोलिझम आणि लठ्ठपणाची व्याधी.

सहव्याधी असल्यास लावा मास्क



देशात कोरोनाचा संसर्ग डोकं वर काढत असतानाच मुंबईतही हीच स्थिती कायमच आहे. ज्यामुळं आरोग्यतज्ज्ञांकडून वृद्ध आणि आधीच सहव्याधी असलेल्यांना मास्क वापरण्याचा सल्ला दिला आहे. या नागरिकांना घरात आणि उच्च जोखमीच्या ठिकाणी मास्क वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार २० मे ते ३ जून दरम्यान एकूण रुग्णांमध्ये तिप्पट वाढ झाल्यानं यंत्रणा सतर्क आहे. राज्यातील एकूण संसर्गाच्या निम्म्याहून अधिक प्रकरणं मुंबईती असून राज्य आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, या १४ दिवसांच्या कालावधीत कोरोनाचे निदान झालेल्या रुग्णांची संख्या १०६ वरून ९५९ वर पोहोचली आहे. पावसाळ्यामुळे श्वसन संसर्गात वाढ होत असून, कोरोना रुग्णवाढीस हे एक कारण असू शकतं असंही तज्ज्ञांचं मत आहे.

कोरोनाच्या धर्तीवर केंद्र सरकारकडून आरोग्य यंत्रणांचा आढावा

देशात सध्या कोरोनाच्या रुग्णसंख्येत वेगानं वाढ होत असल्यामुळं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांसह केंद्रशासित प्रदेशांच्या आरोग्य अधिकाऱ्यांसोबत नुकतीच एक आढावा बैठक घेतली. दिल्लीतील आपत्ती व्यवस्थापन कक्ष, इमर्जन्सी मॅनेजमेंट रिस्पॉन्स सेल, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम आणि दिल्लीतील केंद्र सरकारच्या रुग्णालयांतील प्रतिनिधींच्या उपस्थितीत आरोग्यसेवा महासंचालक डॉ. सुनीता शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडल्याचं सांगण्यात आलं.

# शिक्षण आणि समाजव्यवस्थेतील मुद्द्यांवर भाष्य करणारा चित्रपट, 'निबार'मधील नवीन पोस्टर प्रदर्शित!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेसृष्टीने कायमच सामाजिक भान जपत विविध विषय हाताळले आहेत. आता प्रेक्षकांच्या भेटीला येत असलेला 'निबार' हा आगामी चित्रपटही शिक्षण आणि समाजव्यवस्थेतील मुद्द्यांवर भाष्य करणारा ठरणार आहे. या चित्रपटाचं आकर्षक पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं असून, चित्रपटाच्या पोस्टरमध्ये सूर्योदयाच्या पार्श्वभूमीवर पाच लहान मुलं चालताना दिसत आहेत आणि ही कथा त्यांच्या भोवती फिरणार असल्याचे सूचित होते.

'निबार' मराठी चित्रपटाचं पोस्टर रिलीज : ध्रुव फिल्म्स अँड एंटरटेनमेंट या बॅनरखाली संतोष भणगे, अनिकेत माळी आणि भरत सावंत यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, जितेंद्र भास्कर ठाकरे सहनिर्माते आहेत. चित्रपटाचं दिग्दर्शन सुनील शिंदे यांनी केलं आहे. पोस्टरमध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील काही लोकप्रिय चेहरे झळकत असून, 'निबार' एक सशक्त विषय हाताळणारा चित्रपट ठरणार असून तो प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडेल असे निर्मात्यांचे म्हणणे आहे. शशांक केतकरला 'होणार सून मी ह्या घरची' या मालिकेतील 'श्री' या भूमिकेमुळे विशेष ओळख मिळाली असून त्यानं नाटकं, मालिका आणि '३१ दिवस', 'वन वे तिकीट' सारख्या चित्रपटात दर्जेदार अभिनय केला आहे. सायली संजीवची 'काहे दिया परदेस' या मालिकेपासून कारकीर्द झपाट्यानं वाढली. तिनं 'झिम्मा', 'बस्ता', 'गोष्ट एका पैठणी'ची सारख्या चित्रपटांतून वेगवेगळ्या भूमिका अत्यंत नैसर्गिकपणे साकारलेल्या आहेत.

'रिंगण' 'रेडू', 'मस्का', 'कागर' सारख्या चित्रपटातून शशांक शेंडे यांनी अभिनयाचं नाणं खणखणीतपणे वाजविले आहे.

'निबार' चित्रपटाबद्दल : वरील नमूद केलेले तीनही कलाकार या चित्रपटात आहेत. शशांक केतकर या चित्रपटात प्रमुख भूमिकेत आहे, तर त्याच्याबरोबर सायली संजीव आहे. तसेच मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने नाव कमावलेले शशांक शेंडे यांचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे. देविका दफ्तरदार आणि अरुण नलावडे यांच्यासारखे अनुभवी कलाकारही या चित्रपटाचा भाग आहेत. याशिवाय शांता तांबे, राजेश दुर्गे आणि अनिकेत माळी यांनीही या चित्रपटात भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटाची कथा आणि संवाद राजेश दुर्गे आणि सुनील शिंदे यांनी लिहिले असून, वैभव देशमुख यांनी गीतलेखन केलं आहे. संगीतकार रोहित नागभिडे यांचे संगीत असून आदर्श शिंदे आणि रोहित राऊत यांनी गाणी गायली आहेत. धनंजय कुलकर्णी यांनी छायाचित्रण, तर सुनील जाधव यांनी संकलन केलं आहे. कला दिग्दर्शन सतिश बिडकर, साऊंड डिझाईन अभिजीत देव, कास्टिंग आणि लाईन प्रॉडक्शन शिरीष राणे आणि कार्यकारी निर्माते म्हणून अमोल गायकवाड यांनी काम पाहिलं आहे. 'निबार' हा चित्रपट १३ जून रोजी महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे.

पान १ वरून...

## विकासाच्या अजेंड्यात गडचिरोली अग्रक्रमावर- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

निर्बंध असू नये. वनविभागाने काम करताना लोकाभिमुखता ठेवावी, वन अधिकाऱ्यांकडून गैरवर्तन खपवून घेतले जाणार नाही, मनमानी केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील महत्त्वाचे रस्ते व पूल प्रकल्प जलद गतीने पूर्ण करावेत.

वडसा ते गडचिरोली रेल्वे भूसंपादनाचा आढांवा घेताना या कामात दिरंगाई होत असल्याचे सांगून ही भूसंपादन प्रक्रिया कालमर्यादेत निश्चित करून तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्याच्या एकूण प्रगती करिता ज्या काही तरतुदी करणे आवश्यक आहे व प्रस्तावित करण्यात आले आहे, त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन, या संदर्भात सहपालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

गडचिरोलीचे विषय थेट माझ्यापर्यंत आले पाहिजे यासाठी मी जाणीवपूर्वक येथील पालकमंत्री पद घेतले आहे. लोकप्रतिनिधी व इतरांनी मांडलेल्या सर्व विषयाची नोंद मी घेतली आहे व त्यानुसार जे धोरणात्मक निर्णय घ्यायचे आहेत ते निर्णय घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

याप्रसंगी श्रीक्षेत्र मार्कंडा या धार्मिक पर्यटनावरील माहितीपटाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विमोचन झाले. जिल्ह्याच्या विकासासाठी विविध उद्योग, उद्योजक आणि स्वयंसेवी संस्थांसोबत मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आले.

बैठकीत जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सूर्यवंशी यांनी केले, तर आभार अपर जिल्हाधिकारी नितीन गावंडे यांनी मानले.

## धर्मांतर म्हणजे एका प्रकारे हिंसाचं, घर वापसीचा स्वीकार करा; सरसंघचालक मोहन भागवतांचं आवाहन

संघाच्या कार्याबद्दल लोकांमध्ये आस्था निर्माण झालेली आहे. धर्मांतराबद्दल चर्चा होण्यासही सुरुवात झालीय.

काँग्रेसचे माजी केंद्रीय राज्यमंत्री अरविंद नेताम यांनी उपस्थित केलेल्या धर्मांतराच्या मुद्द्यावर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले की, आदिवासी भागांमध्ये धर्मांतराचा मुद्दा हा अतिशय गंभीर आहे. विविध प्रलोभने, आमिष दाखवून आदिवासींचे धर्मांतर केले जात असेल तर हे अत्यंत चुकीचे आहे. धर्मांतर एका प्रकारे हिंसाचं असल्याचे देखील सरसंघचालक मोहन भागवत म्हणालेत. मात्र, ज्यांना घर वापसी करायची असेल त्यांचा स्वीकार देखील समाजाने केला पाहिजे, असं देखील ते म्हणाले आहेत.

यावेळी बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी पाकिस्तानवर बोचरी टीका केलीय. पहलगाम येथे दहशतवादी हल्लानंतर देशभरात मोठा आक्रोश होता. भारतीय सैन्याने आपली क्षमता पुन्हा सिद्ध केली आहे.

# अलिशान अन् महागडे फ्लॅटस् असणाऱ्या पुण्यातील प्रोजेक्टशी शशिकांत चव्हाणांचं कनेक्शन, ७००-८०० कोटींची मालमत्ता? अंधारेंनी सगळंच काढलं

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :**वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाशी संबंधित तपासामध्ये अनेक वेगवेगळी धक्कादायक प्रकरणे समोर येत आहेत. या प्रकरणातीलआरोपी राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे यांनी फरार होण्यासाठी वापरलेली थार गाडी ही संकेत चोंधे यांच्या मालकीची होती. विशेष म्हणजे, संकेत चोंधे यांच्या पत्नी धनश्री चोंधे यांनी पती आणि दीराविरोधात छळवणुकीची तक्रार खडक पोलीस ठाण्यात दाखल केली होती. मात्र, त्या तक्रारीवर कोणतीही कारवाई न झाल्याचा गंभीर आरोप चोंधेच्या पत्नीने केला आहे. धनश्री चोंधे यांच्या मते, संकेत चोंधे याच्यावर कारवाई न होण्यामागे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांचा हात आहे. त्यांचे राजेंद्र हगवणे, जालिंदर सुपेकर आणि चोंधे यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे ही तक्रार दुर्लक्षित करण्यात आली, असा आरोप त्यांनी केला आहे. आता या प्रकरणावर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत भाष्य केलं आहे.



सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत याबाबतची आपली भूमिका मांडली आहे. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, शशिकांत चव्हाण यांची सख्खी बहीण ही जालिंदर सुपेकर यांची पत्नी आहे. थार गाडी मालकाविरोधात चोंधेच्या सुनेच्या खडक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहे, तिथले पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्यावर देखील गुन्हे दाखल आहेत. पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण आणि आणि साथीदार यांच्यावर ३०७ चा गुन्हा दाखल आहे, ते आता जामिनावर बाहेर आहेत आणि प्रमोशन घेऊन सेवेत आले आहेत. चव्हाण विरोधात चाकण पोलीस ठाण्यात चारचाकी गाडीचा गुन्हा दाखल आहे. वेगवेगळ्या वर्तमानपत्रामध्ये त्यांच्या बातम्या आल्या आहेत. अनेकांना त्यांनी त्रास दिला असल्याचं देखील सुषमा अंधारे यांनी म्हटलं आहे. तर मोक्का कारवाई टाळण्यासाठी १० लाख मागितले असल्याचं देखील यावेळी अंधारेंनी सांगितलं आहे.

तर ठढख अंतर्गत माहिती मागितली होती त्यात यांच्या पत्नी आणि कुटुंबातील सदस्यांची माहिती मागितली, मात्र ती देण्यात आली नाही. वडील भरत चव्हाण यांच्या नावावर रावेतला जमीन करार नामा आहे. त्यात चव्हाण यांची पत्नी आणि वडील यांचं नाव आहे. रावेत परिसरामध्ये एलिगन्स नावाची मोठी स्कीम आहे, त्यात कोटींच्या पुढे फ्लॅट आहेत. आम्हाला कुणाला व्यक्तिगत टार्गेट करायचे आहे, ना पक्षीय राजकारण करायचे आहे. शशिकांत चव्हाण यांच्य वर झालेले सीडीआरचे आरोप हे वैष्णवी हगवणे प्रकरणात लिंक आहे, का ते तपासलं पाहिजे. या सर्व माहितीनुसार गृहमंत्री यांना विनंती आहे, त्याचा इन्कम सोर्स काय आहे, इतकी मोठी मालमत्ता कशी जमवली आहे, ते गरीब लोकांना न्याय देऊ शकतील असा सवाल देखील यावेळी सुषमा अंधारेंनी उपस्थित केला आहे.

अनेक तालुक्यात शशिकांत चव्हाण यांच्या मालमत्ता आहेत. इतकी मालमत्ता असेल तर चोंधेच्या सुनांच्या गुन्ह्यात लक्ष का देत नाही. ह्या लढाईत माझ्यावर दबाव तंत्र येऊ शकते, सर्व मालमत्ता ७०० ते ८०० कोटींची असण्याची शक्यता आहे. रावेतमधल्या स्कीममधील १ फ्लॅट २.५ कोटींचा आहे. हे सगळे लोक वैष्णवी हगवणे प्रकरणात कुठून ना कुठून लिंक आहेत. साधारण पोलीस निरीक्षकाकडे इतकी प्रॉपर्टी येते ते गृहमंत्री यांनी पाहिलं पाहिजे. पोलीस खात्यात आपले नातेवाईक आहेत त्यामुळे काही होत नाही असं हगवणे कुटुंबाला वाटत होतं. सगळ्यांची गृहमंत्री यांनी चौकशी केली पाहिजे. शशिकांत चव्हाण यांच्यावर गंभीर गुन्हे असताना जामिनावर असताना प्रमोशन होतं, त्यात गृहमंत्री यांनी लक्ष घालावं, अशी मागणी सुषमा अंधारेंनी केली आहे.

राज ठाकरे आणि उध्दव ठाकरे यांच्या एकत्र येण्याबाबत सुषमा अंधारे म्हणाल्या, तिकडून राज ठाकरे यांनी भाजपचा हात सोडला की इकडे यांना हात धरायची गरज नाही. दोन भावांनी हातात हात धरले तर कुठले हात हातात घ्यायची गरज नाही. आमच्या पक्ष प्रमुखांनी सांगितलं आहे की, महाराष्ट्र हितासाठी आम्ही छोटे विषय बाजूला ठेऊ.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### फिर्यादीच्या ओळखीच्याच व्यक्तीने दिली टिप आणि दरोडेखोरांनी ३१ लाख लुटले



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील सानपाडा मधील एटीएम मध्ये पैसे भरताना अचानक जवळपास आठ जण आले आणि आम्ही पोलीस असल्याची बतावणी करून पैसे भरणाऱ्या व्यक्तीला तब्बल ३१ लाख ७३ हजारांची रक्कम घेऊन सोबत नेऊन मारहाण करून पाम बीचवर सोडून निघून गेले. पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच तांत्रिक मदतीच्या आधारे पोलिसांची टीम थेट बेंगलोर कर्नाटक याठिकाणी जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने ८ जणांना ताब्यात घेत, त्यांची चौकशी केली असता त्यांनीच दरोडा टाकल्याचे निष्पन्न झाले. सर्व आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, त्यांच्या चौकशीतून एक धक्कादायक बाब उघडकीस आली की, पैसे भरणाऱ्या व्यक्तीची टिप त्याच्याच एका जवळच्या व्यक्तीने दिल्याने दरोडेखोर योग्य वेळी त्या ठिकाणी पोहचून ही घटना घडली. घटनेचा पुढील तपास उपायुक्त पंकज डहाणे आणि त्यांची टीम करत आहेत.

### आरसीबी विजयानंतर एफसी रोडवर गोंधळ घालणाऱ्या ४० जणांवर गुन्हे दाखल



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** एफसी रोडवर उलटबाजी करणाऱ्या ३० ते ४० तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आयपीएलमध्ये १७ वर्षानंतर आरसीबी संघाने विजेतेपद पटकावल्यानंतर पुण्यात क्रिकेट चाहत्यांनी जल्लोष केला. एफसी रोडवर मोठ्या संख्येने क्रिकेट रसिक एकत्र जमले होते. मात्र, कोणतीही पूर्वपरवानगी न घेता मोठ्या आवाजात फटाके फोडण्यात आले. काही तरुणांकडून रस्त्यावर उभे राहून हुल्लडबाजी करत नागरिकांना करण्यात आली. वाहनचालकांना अडथळा निर्माण करण्यात आला. यावेळी काही तरुणांकडून असभ्य वर्तन देखील करण्यात आलं. आता याचं तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून घटनास्थळी सीसीटीव्ही फ ुटेजच्या आधारे हुल्लडबाजी करणाऱ्या ३० ते ४० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री मोठ्या संख्येने तरुण हे आयपीएल च्या सामना संपल्यावर रॉयल चॅलेंजर्स बंगलोर यांच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी गुडलक चौकात जमले होते. तरुणांनी नागरिकांच्या जीवास धोका निर्माण होईल या पद्धतीने फटाके फोडले. तसेच सार्वजनिक ठिकाणावर येऊन गोंधळ घातल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नांदेड मध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यात आज सायंकाळी पाच वाजता वादळी वाऱ्यासह पावसाने दमदार हजेरी लावली आहे. नांदेड ते बिलोली राज्य महामार्गावर वादळी वाऱ्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे ठीक-ठिकाणी तुटून पडली आहेत. त्यामुळे महामार्गावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तर तासभर चाललेल्या या मुसळधार पावसामुळे शेतींना तळ्याचे स्वरूप प्राप्तझालेआहे.

### शुभांगी शिंदे आत्महत्या प्रकरणात भाजप पदाधिकाऱ्याचा सहभाग

बीडः बीडच्या शुभांगी शिंदे आत्महत्या प्रकरणात म ोठी माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील पाचवा आरोपी हा भाजपचा पदाधिकारी आहे. संदीप काचगुंडे असं त्याचे नाव असून तो भाजपचा धारूर तालुका अध्यक्ष आहे. संदीप काचगुंडे सध्या फरार असून पोलिस त्याच्या शोधात आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील गिता येथील शुभांगी शिंदे हिने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली होती. या प्रकरणी आरोपी पतीसह सासरा, सासू आणि नणंद यांना अटक करण्यात आली.

# जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमांतर्गत आमदार संजय केळकर यांनी नागरिकांशी साधला संवाद

दैनिक आपला विदर्भ




**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यात एकीकडे पाण्याची कमतरता असताना दुसरीकडे नव्याने सुरू असलेल्या बांधकामांसाठी पाण्याची पळवा-पळवी सुरू आहे. पाणीपुरवठा नियोजनाचा बट्ट्याबोळ झाला असून, सोमवारी अधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली. तर वाढत्या बेकायदा बांधकामांचा मुद्दाही येत्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित करून कठोर कारवाईची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमांतर्गत आमदार संजय केळकर यांनी खोपट येथील भाजप पक्ष कार्यालयात नागरिकांशी संवाद साधत नागरी समस्या ऐकून घेतल्या. काही समस्या तात्काळ फोनवरून सोडवण्यात आल्या तर उर्वरित समस्या पाठपुरावा करून सोडवण्यात येतील, असे केळकर यांनी सांगितले.

पत्रकारांशी बोलताना केळकर यांनी ठाण्यात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत नाराजी व्यक्त केली. ३०-३५ बेकायदा बांधकामांची यादीच प्रशासनाला देण्यात आली असून, त्यावर तक्रारदाराचे समाधान करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. न्यायालयाने कान उघडणी केल्यावरच कारवाई केली जाते. या इमारतींना देण्यात आलेले पाणी आणि वीज तत्काळ तोडण्यात यावी. येत्या अधिवेशनात याबाबत आवाज उठवून अशा बांधकामांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे संजय केळकर यांनी सांगितले. शहरात पाण्याची कमतरता असून, आवश्यक तेथे बोअरही खणलेल्या नाहीत. अशावेळी बांधकामेही मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यांना बेसुमार पाणी पुरवठा केला जात आहे. याकरिता पाण्याची पळवा-पळवी करण्यात येत असल्याने अनेक भागात पाण्याची कमतरता भासत आहे. पाणी पुरवठ्याचे नियोजन कोसळले असून याबाबत सोमवारी अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा प्रश्न अधिवेशनात लावून धरत सातत्याने पाठपुरावा केल्याने राज्यातील सुमारे ५० हजार कामगारांना वारसा हक्काचा लाभ मिळाला आहे. काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जाणीवपूर्वक लाभार्थ्यांना ऑर्डर देण्यात चालढकल होत असल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी केला. अंबरनाथ नगरपालिकेतील ४७ लाभार्थ्यांच्या ऑर्डर काढण्यात येणार आहेत. इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ऑर्डर काढण्यासाठी मी पाठपुरावा करत आहे. ठाणे महापालिकेतील सफाई कामगारांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्वांना हा लाभ मिळेपर्यंत मी प्रयत्नशील राहीन, असे केळकर म्हणाले.

## स्वाधार योजना; १० जूनपर्यंत अर्जातील त्रूटीची पुर्तता करा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने विभागाच्या संकेतस्थळावर १५ मार्च पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. ज्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचा अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन प्रणालीवर भरलेले आहेत, त्या सर्व अर्जांची तपासणी कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीमध्ये आहेत त्यांनी दि. १० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने त्रूटीची पुर्तता करावी, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच भोजन, निवास व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविली जाते. इ. ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.

स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ मार्च पर्यंत वाढविण्यात आली होती. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रृटीमध्ये आहेत त्यांनी दिनांक १० जून २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने त्रृटी पुर्ण करण्याकरीता अंतिम मुदत देण्यात येत आहे. विहित मुदतीत त्रूटी पुर्ण करुन अर्ज फेरसादर न केल्यास अर्ज अपात्र, बाद ठरतील, याची नोंद घ्यावी. तसेच स्वाधार योजनेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत, त्या सर्व विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या लॉग इनमध्ये बँक तपशिल भरण्याबाबतचा टॅब उपलब्ध करुन देण्यात आलेला असून बँक तपशिल भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, असे समाजकल्याण विभागाकडून प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

### कोट्यवधींचा निधी उधळण्यापेक्षा गडकिल्ल्यांचे संवर्धन करा; 'लाडकी बहीण'वरुन संजय गायकवाडांचा सरकारला घरचा आहेर

**रायगड/प्रतिनिधी :** एकीकडे लाडकी बहीण योजनेसाठी निधी जमवताना राज्य सरकारची चांगलीच दमछाक होत आहे. तर दुसरीकडे आता सरकारमधील आमदारांनीच या योजनेच्या विरोधात भूमिका घेतल्याचे दिसून आले. लोकांवर असा कोट्यवधींचा निधी उधळण्यापेक्षा ते पैसे गडकिल्ल्यांच्या संवर्धनावर खर्च करा असा सल्ला शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी दिला. ते रायगडवर माध्यमांशी बोलत होते.

### ईडी कार्यालयाला लागलेल्या आगीत छगन भुजबळांचा पासपोर्ट जळाला, न्यायालयाकडून परदेश प्रवासासाठी मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांना परदेशातील प्रवासाकरता मुदतवाढ देण्यात आली आहे. एप्रिलमध्ये मुंबईच्या ईडी कार्यालयात लागलेल्या आगीमुळे छगन भुजबळ आणि पंकज भुजबळ यांचे पासपोर्ट खराब झाले आहेत. मुंबईतील ईडी कार्यलायात एप्रिल महिन्यात आग लागली होती. या आगीत अनेक महत्वाचे दस्तऐवज जळाल्याचं समोर आलं आहे. यामध्ये भुजबळ आणि त्यांचे पुत्र पंकज भुजबळ यांच्या पासपोर्टचाही समावेश असल्याची कबुली ईडीने मुंबई सत्र न्यायालयापुढं दिली आहे. यानंतर याची नोंद घेत मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टानं छगन भुजबळ आणि पंकज यांना परदेशात प्रवासाकरता मुदतवाढ मंजूर केली आहे. मनी लॉन्डिंग प्रकरणात आरोपी भुजबळ पिता-पुत्र सध्या जामीनावर आहेत. त्यामुळे परदेशात जाण्यापूर्वी त्यांना प्रत्येकवेळी कोर्टाची रितसर पूर्वपरवानगी घ्यावी लागते. त्यानंतरच तपासयंत्रणेकडं जमा असलेले त्यांचे पासपोर्ट त्यांना ठराविक काळासाठी दिले जातात.

## रिसोड तालुका ग्राहक पंचायतच्यावतीने पर्यावरण दिन उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ




**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड तालुका ग्राहक पंचायत च्या वतीने ५ जून रोजी वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी दर वर्षी पाच जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो त्या अनुषंगाने काल दिनांक पाच जून रोजी अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांत यांच्या सूचनेनुसार जागतिक पर्यावरण सप्ताह साजरा करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून रिसोड तालुका ग्राहक पंचायत च्या वतीने काल दिनांक ५ जून रोजी श्री पिंगलक्षी देवी संस्थान परिसरामध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. रिसोड तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष कमलकिशोर बगडिया, ज्येष्ठ सदस्य संजय उकळकर, प्रभाकर पाटील गजानन बानोरे, संतोष वाघमारे, सुरज गुप्ता यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षाचे संगोपन करण्याची जबाबदारी रिसोड तालुका ग्राहक पंचायतने करण्याचे ठरले. याप्रसंगी ग्राहक पंचायत चे इतर सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

# मुरूम माफिया बेलगाम, तांदुळवाडी शिवारातून मुरुमाचे अवैध उत्खनन,२ ट्रॅक्टर केले जप्त

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**लोणार :** बुलडाणा तालुक्यातील नांद्राकोळी,कोलवड, तांदुळवाडी, या बुलडाणा शहराला लागून असलेल्या भागात शासकीय व खाजगी जमिनीतून अवैधपणे मुरुमाचे उत्खनन सुरू आहे.काही राजकीय पुढाऱ्यांचा वरदहस्त असल्याने याकडे महसूल विभागाचे कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याचं आरोप सामान्य जनतेकडून होत असते.तालुक्यात मुरूम माफिया बेलगाम असताना गुरुवारी बुलडाणा तहसीलदार यांनी पथक पाठवून तांदुळवाडी शिवारात शासकीय जमिनीतून अवैधपणे मुरुमाचे उत्खनन करून वाहतूक करणारे २ ट्रॅक्टर जप्त केले आहे.या कारवाईमुळे तालुक्यातील मुरूम माफिया मध्ये खळबळ उडाली आहे.

या बाबत प्राप्त माहिती अशी की देऊळघाट महसुली मंडळातील तांदुळवाडी शिवारात शासकीय जमीन असलेलं पराडा आहे.या ठिकाणाहून अनेक मुरूम माफिया रात्रंदिवस या शासकीय जमिनीतून जेसीबी लावून मुरुमाचे अवैध उत्खनन करीत आहे.या मुळे आतापर्यंत हजारों ब्रास मुरूम चोरून या माफियांनी लाखोंचा महसूल चोरी केला आहे.बुलडाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांना गुरुवारी गुप्त माहिती मिळाली की तांदुळवाडी शिवारात शासकीय जमिनीतून मुरुमाचे उत्खनन सुरू आहे.माहिती मिळताच त्यांनी दुपारी एक पथक रवाना केले तेव्हा मुरुमाची अवैध वाहतूक करणारे २ ट्रॅक्टर पकडण्यात आले.मुरूम वाहतूकसाठी रॉयल्टी बाबत चालकांना विचारपूस केली असता चालकांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.म्हणून दोन्ही ट्रॅक्टर जप्त करण्यात आले असून दंडात्मक करवाई करणार असल्याची माहिती बुलडाणा तहसील प्रशासनाने आज ६ जून रोजी दुपारी ३ वाजता दिली आहे.

## विविध वृत्त...

### मोताळा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्यभिषेक दिन उत्साहात

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा जि.बुलढाणा येथे आज दि.६ जून रोजी शिवराज्यभिषेक दिवस सोहळा उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी पंच परीवर्तन व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संस्थेच्यावतीने विविध व्यसायातील माहिती दर्शक स्टॉल, प्रवेश प्रचार स्टॉल मांडण्यात आलेले होते.

कार्यक्रमात नंदकिशोर जाणे, ॲड. योगेश पाटील, गणेश झंवर, प्रमोद कौसकर, विश्वास पाटील, संस्थेचे आय.एम.सी. अध्यक्ष प्रसाद जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी नागरिकत्व आणि शिष्टाचार कुटुंब प्रबोधन, स्वदेशी विचारांचा प्रसार, सामाजिक समरसता आणि पर्यावरण संरक्षण तसेच शिवचरित्र अशा विविध विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात बाल छत्रपती शिवाजी राजे यांच्या वेशभुषेत देवाशीष चिंचोले तर मॉसाहेब जिजाऊ यांच्या वेशभुषेत स्वरा इंगळे होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे प्राचार्य एस.डी.गंगावणे यांनी तर सुत्रसंचालन निदेशक ए.एस. पाटील यांनी केले. आभारप्रदर्शन संस्थेचे वरीष्ठ लिपीक व्ही.जी. सरवदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

### चिखली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिव राज्यभिषेक दिन साजरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखली येथे आज दि. ६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन ऑनलाईन व्हिडिओद्वारे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला आमदार श्वेताताई महाले पाटील, अंकुशराव पाटील, आयएमसीचे उपाध्यक्ष अजित कोठारी, कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. केदार ठोसर, प्रा. प्रशांत देशमुख, आयएमसी सदस्य मनोज सोनूने, भिकाजी पाटील, प्रशांतजी बोधेकर, मिलिंद हिवाळे, अमोल गवले, प्राचार्य श्री.बेदरकर, सागर पुरोहित यांची उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते यांनी डॉ. केदार ठोसर यांनी पर्यावरण संरक्षण तर प्रशांत देशमुख यांनी सामाजिक समरसता या विषयावर प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाची प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य बेदरकर यांनी केली. यावेळी प्रशिक्षणार्थ्यांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पारंपरिक खेळ, पारंपरिक वेशभूषा यांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल अंभोरे यांनी तर आभार प्रदर्शन गणेश घुगे यांनी केले. या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य तथा सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

### तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, खामगाव कार्यक्षेत्रातील जळगाव जामोद व मलकापूर तालुक्यासाठी जून २०२५ महिण्याचा शिबिर दौरा जाहिर करण्यात आला आहे. नागरिकांनी तालुका स्तरीय शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे. शिबिर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे : जुन महिण्यात जळगाव जामोद येथे १३ व २५ रोजी तर मलकापुर येथे १७, २४ व ३० जून रोजी होणार आहे. शिबिराच्या ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक व सहायक रोखपाल हजर राहणार आहेत.

### बुलढाण्यात सन उत्सवाच्या अनुषंगाने पोलिसांची मॉक ड्रिल आणि रुट मार्च



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यामध्ये आगामी सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो असतो. या उत्सवात सहभागी होणाऱ्यांची संख्या लक्षात घेता पोलिसांकडून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी रंगीत तालीम घेण्यात आली आहे. यामध्ये दंगा काबू पथकासह रॅपिड ॲक्शन फोर्सच्या माध्यमातून कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती उद्भवल्यास काय खबरदारी घ्यायची याची रंगीत तालीम घेण्यात आली आहे. यावेळी बुलढाणा शहरात रूट मार्च सुद्धा काढण्यात आला आहे. या आगामी सण उत्सवात कुठल्याच प्रकारच्या अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांनी सांगितले आहे.

# वार्षिक सर्वसाधारण सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले मार्गदर्शन; नाविण्यपूर्ण उपक्रमास प्रोत्साहन द्या- गुलाब खरात

## पर्यावरण दिनानिमित्त घेतली शपथ

**दैनिक आपला विदर्भ**




**बुलढाणा/प्रतिनिधी :** उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष बुलढाणा येथील हिरकणी महिला प्रभागसंघ रायपूरची ''वार्षिक सर्वसाधारण सभा'' ग्रामपंचायत माळवंडी येथे आज दि. ५ जून रोजी घेण्यात आली. या सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी विविध विषयावर मार्गदर्शन करुन नाविण्यपूर्ण उपक्रम तसेच गावात उपलब्ध नसलेल्या व्यवसायांवर भर देण्याचे आवाहन केले.

यावेळी अति. कार्यकरी अधिकारी श्री. मोहन, प्रकल्प संचालक राजेश इंगळे, डेप्युटी सीईओ (महिला बाल कल्याण) श्री. एंडोले, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रांत जाधव, जिल्हा व्यवस्थापक श्री. तऱ्हेकर, माळवंडी सरपंच संगीता चव्हाण, उपसरपंच अशोक चव्हाण आदी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिलांचा विकास कशाप्रकारे साधला जाऊ शकतो, बचतीचे महत्व, उद्योजक महिलांचे भविष्यातील नियोजन, उत्पादनाचे पॅकेजिंग, ब्रँडिंग, गुणवत्ता कशी असायला पाहिजे अशा विविध विषयावर सभेमध्ये सविस्तररित्या मार्गदर्शन केले. त्यानंतर मिशन + उपक्रमा बद्दल माहिती दिली. यामध्ये गरीबातील गरीब कुटुंबातील ज्यांचे १ लाखांपेक्षा उत्पन्न कमी आहे. अशा १० वी परीक्षेत चांगल्या गुणवत्तेने पास झालेल्या मुला मुलींसाठी मिशन + उपक्रमाअंतर्गत त्यांच्यासाठी , , इत्यादी क्लासेसच्या फी भरणे गरीब कुटुंबांना शक्य होत नाही. तर त्या विद्यार्थ्यांना मोफत क्लासेस ची व्यवस्था या उपक्रमांतर्गत होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी हिरकणी प्रभागसंघाचा लेखाजोखा, त्यातील आर्थिक उलाढाल तसेच वार्षिक सभेचे केलेले नियोजन या संदर्भात प्रशंसा करत त्यांनी पुढील वाटचालीस कर्मचारी व पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या.

पर्यावरण दिनानिमित्त सन्मानिय व्यासपीठावरील अधिकारी कर्मचारी तसेच उपस्थित हिरकणी महिला प्रभागसंघाचे सर्वसाधारण सभेचे सन्मानिय पदाधिकारी यांची पर्यावरण संरक्षण तसेच संवर्धनाबाबत शपथ घेण्यात आली. प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी व्यवसायाबाबत महिलांच्या संकल्पना, येणाऱ्या समस्या, विषयी मार्गदर्शन केले. समूहातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनाला इतर समूहातील महिलांनी प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे जेणेकरून ती महिला स्वतः प्रोत्साहित होऊन आपला व्यवसाय जोमाने करेल.

**वार्षिक सर्वसाधारण सभा विषय**

मागील वर्षात प्रभागसंघाने केलेल्या कामाचा आढावा आणि पुढील वर्षाचे नियोजन यासंबंधी चर्चा करणे, प्रभागसंघाचे धोरणात्मक निर्णय घेणे, उपसमित्ताने केलेल्या कामाचा आढावा घेणे, वार्षिक सभासदत्व आणि भाग भांडवल याबाबत निर्णय घेणे, प्रभागसंघाचे काम सुरळीत चालवण्यासाठी नियम, नियमावली तयार करणे, प्रभागसंघाच्या कर्मचाऱ्यांचा कामांचा आढावा घेणे, गावातील तालुक्यातील सामाजिक प्रश्नांवर चर्चा आणि त्या संबंधातील उपाययोजनांसाठी नियोजन करणे, सदस्यांना प्रभाग संघाने केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देणे, आणि महत्त्वाचे म्हणजे वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे तरतुदी सुचवणे.

वार्षिक सर्वसाधारण सभा हिरकणी महिला प्रभागसंघ अध्यक्ष सविता तरमळे, सचिव ज्योती सुरुशे, तालुका अभियान व्यवस्थापक श्रीपाल सोनटक्के, तालुका व्यवस्थापक सिंगतकर, प्रभाग समन्वयक (रायपूर प्रभाग) निलेश इंगळे, गिरीधर हिवाळे, दत्तात्रय तळेकर, रायपूर प्रभागातील सर्व समुदाय संसाधन व्यक्ति, लेखापाल विद्या पाटोळे, तसेच रायपूर प्रभागातील ग्रामसंघ पदाधिकारी तसेच सर्व साधारण सभेतील पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली.

## ठाकरे ब्रँड टिकला पाहिजे; मनसैनिकांनी शिवतीर्थावर राज ठाकरे यांची भेट घेत साद घातली



**मुंबई/प्रतिनिधी :**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महेश मांजरेकर यांना युट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये एकत्र येण्याविषयी संकेत दिल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुद्धा एका जाहीर कार्यक्रमांमध्ये एकत्र येण्याचे संकेत दिले. तेव्हापासून महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये उद्धव आणि राज एकत्र येणार याबाबत चर्चा रंगली आहे. मात्र, अजूनही याबाबत स्पष्टता मात्र आलेली नाही. गेल्या काही दिवसांपासून मनसैनिक आणि शिवसैनिकांमध्ये दोन भावांच्या म नोबिलनाची चर्चा जोरदार सुरू आहे. इतकेच नव्हे तर या दोन भावांनी एकत्र यावे अशी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाची सुद्धा भावना आहे. मात्र, पुढाकार कोण घेणार याबाबत मात्र अजूनही स्पष्टता आलेली नाही.

## वनशक्ती २०२५; देशभरातील महिला वनअधिकाऱ्यांचा चंद्रपूरमध्ये एकत्रित संवाद




**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर येथील वन अकादमी येथे वनशक्ती २०२५ या राष्ट्रीय महिला वनपरिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते ५ जून रोजी या परिषदेचे उद्घाटन झाले. देशभरातील विविध राज्यांमधून आलेल्या महिला वनअधिकाऱ्यांनी या परिषदेत सक्रिय सहभाग घेतला.

आज दुसऱ्या दिवशी वनसंवर्धन, वनरक्षकांची भूमिका, आणि लोकसहभाग या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. या चर्चासत्रांमध्ये महिला अधिकारी तसेच पर्यावरण क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

गुजरातच्या रशीला बेन वाढर या रेंज फॉरेस्ट ऑफिसर म्हणाल्या, या परिषदेमुळे विविध राज्यांतील महिला वनअधिकाऱ्यांना एकत्र येऊन अनुभवांची देवाणघेवाण करता आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रेरणा मिळाली आणि कार्याच्या दिशेला स्पष्टता आली.

झारखंडच्या पहिल्या महिला अधिकारी अंजना तिरकी यांनी सांगितले की, वनविभाग हे अतिशय संवेदनशील क्षेत्र असून यामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढणे आवश्यक आहे. अशा राष्ट्रीय परिषदांमुळे महिलांना एकत्र येऊन समस्या मांडण्याची व त्या सोडविण्याची संधी मिळते. स्थानिक पातळीवर अशा कार्यक्रमांचे आयोजन होणे गरजेचे आहे.

## विशिष्ट बियाणे व रासायनिक खताचा आग्रह धरु नये; कृषि विभागाचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकरी खरीप हगांमाच्या लगबगीला लागला असून, शेत मशागती, खते व बियाणे खरेदी करणे सुरु झाली आहे. कपाशी व सोयाबीन जिल्ह्यातील मुख्य पिके असून जिल्ह्यातील काही भागात विशिष्ट कापुस व सोयाबीन बियाणे वाणाची मागणी करत असल्याचे दिसुन येत आहे. तरी सर्व शेतकरी बंधुना आवाहन करण्यात येते की, बियाण्यामध्ये सर्वच वाण हे उत्कृष्ट दर्जाचे असुन भरपुर उत्पन्न देणारे आहेत. त्यामुळे विशिष्ट बियाणे किंवा रासायनिक खताचा आग्रह करुन नये.

सोयाबीन पिकात स्वपरागीकरण होत असल्याने शेतक-यांनी सोयाबीन बियाण्याची दरवर्षी बाजारातून नवीन वाण खरेदी करण्याची आवश्यकता नाही. एकदा खरेदी केलेल्या बियाण्याचे योग्य प्रकारे संवर्धन केल्यास बियाणे तीन वर्षापर्यत वापरल्यास बियाण्यावरील खर्च कमी होईल. तरी सुध्दा बुलडाणा जिल्ह्यातील काही भागामध्ये शेतकरी विशिष्ट कापुस व सोयाबीन बियाणे वाणाची मागणी करत आहे. कपाशीतील सर्व वाणाचे बिटी जैव तंत्रज्ञान एकच असुन सर्वाची उत्पादन क्षमता जवळपास सारखीच आहे. त्यामुळे शेतक-यांनी एकाच वाणाचा आग्रह धरण्यात येऊ नये. पिकाचे उत्पन्न हे जमिनीचा पोत, पाऊसमान, योग्य वेळी केलेली शेती मशागत यावर अवलंबुन आहे. पिकाच्या योग्य वेळेत झालेला पाऊस, जमिनीचा उत्तम पोत व वेळी व केलेल्या मशागतीमुळे भरगोस उत्पन्न मिळते.

घरच्या सोयाबीन बियाण्याची योग्य चाळणी व बिज प्रक्रीया करून घरच्या घरी उगवणशक्ती तपासुन १०० मिली पाऊस पडल्यानंतर २ ते ३ सेमी खोलीत बियाण्याची पेरणी केल्यास पिक उगवणीबाबत तक्रार राहणार नाही. कुठलेही बियाणे खरेदी करताना पक्के बिल घ्यावे. लेबल वरील लॉट नंबर व बिलातील लॉट नंबर पडताळुन पाहावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कपाशी पिकाची लागवड १ जुन नंतरच करावी,असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

## 'ईद-उल-अज़हा' तथा 'बकरी ईद' निमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून राज्यातील जनतेला शुभेच्छा

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील नागरिकांना 'ईद-उल-अज़हा' अर्थात 'बकरी ईद'च्या शुभेच्छा दिल्या असून, या पर्वाच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य, सलोखा, सौहार्द अधिक बळकट करण्याचे आवाहन केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात, ''त्याग, श्रद्धा, समर्पण या उदात्त मूल्यांची शिकवण देणारा 'ईद-उल-अज़हा'चा सण समाजात एकता, शांतता, बंधुता, सौहार्द वाढवणारा आहे. हा सण एकमेकांशी प्रेम, सहकार्य, आपुलकीची भावना दृढ करणारा असून, समाजातील वंचित, गरजू, उपेक्षित घटकांप्रती आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित करणारा आहे. या पवित्र सणाच्या निमित्ताने सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आनंद नांदो,'' अशी सदिच्छा व्यक्त करत, एकात्मता, सहिष्णुता आणि परस्पर सन्मानाच्या मूल्यांना अनुसरून सामाजिक सलोखा दृढ करण्याचे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर दुसरबीड जवळ पूजा ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात होता होता टळला

**दैनिक आपला विदर्भ**

**देवानंद सानप**




**लोणार :** ७/०६/२०२५ रोजी सकाळी ३.१५ वा दरम्यान समृद्धी महामार्गावर चै.न.३१२.८ मुंबई कॉरिडोर वर पूजा ट्रॅव्हल्सचा अपघात झाला. सविस्तर वृत्त असे की पूजा ट्रॅव्हल्स नागपूर वरून पुणे येथे जात असताना चॅनेज नंबर ३१२ .८ जवळ सदर ट्रॅव्हल्स समोर जात असलेल्या ट्रेलर ट्रक क्रमांक -०६--५१८० ला लोखंडी सळई घेऊन जात असताना सदर ट्रॅव्हल्सचा चालक विनोद सुधाकर पखाले व ४० वर्षे रा. वर्धा याला समोरील ट्रेलर चा अंदाज न आल्याने ट्रॅव्हल्सल क्लिनर साईडला समोरून धडकली . यामध्ये प्रवास करीत असलेले प्रवासी कल्पना रमेश नासरे वय ३० वर्ष राहणार नागपूर. यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. सदर जखमी यांना तात्काळ समृद्धी महामार्ग १०८ ॲम्बुलन्स चे डॉक्टर वैभव बोराडे व चालक दिगंबर शिंदे यांनी उपचारा कामी जालना येथे घेऊन गेले. व अथर्व देशमुख वय २४ वर्ष रा. वर्धा. विक्की मानसिंग चव्हाण वय ३०वर्षे रा.शिवनी मध्य प्रदेश असे दोन जण किरकोळ जखमी झाले. त्यांना जागेवरच डॉक्टर स्वप्निल सुसर व चालक पडघान यांनी प्रथमउपचार केले. सदर ट्रॅव्हल्स मध्ये एकूण ३३ प्रवासी प्रवास करीत होते. अपघाताची माहिती मिळताच तात्काळ महामार्ग पोलीस चे पोलीस हेड कॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे, अरुण भुतेकर .संदीप किरके . विजय आंधळे यांनी महाराष्ट्र सुरक्षा बल चे जवान भुसारी, राठोड यांच्या मदतीने अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स ला सुरक्षित बॅरीकेटिंग करून वाहतूक नियंत्रण केले. तसेच पोलीस स्टेशन बिबी चे ठाणेदार संदीप पाटील , पोलीस हेडकॉन्स्टेबल अरुण मोहिते, सांगळे यांनी इतर प्रवासी यांना पर्यायी वाहनाने पुढील प्रवासासाठी रवाना केले. तसेच सदर अपघात ग्रस्त ट्रॅव्हल्स व ट्रेलर वरील लोखंडी खाली पडलेल्या सळई टिमचे श्रीकृष्ण बछीरे ,आकाश राठोड, दिगंबर इंगोले यांनी दोन्ही वाहने सुरक्षित बाजूला घेऊन महामार्ग मोकळा केला. दैव बलत्वर म्हणून सदर ट्रॅव्हल्स मधील इतर प्रवासी सुखरूप वाचले . ट्रॅव्हल्स डाव्या बाजूस पूर्णपणे चिरत गेली असतील तर मोठा अपघात घडला असता. सदर अपघाताबाबत पोलीस स्टेशन बीबी अधिक तपास करीत असून पुढील कारवाई करीत आहे.